**First Semester Examination : OCTOBER - 2019**

# MARATHI (Composite)

**Std. IX**

Time : 2 Hours | Max. Marks : 40

## विभाग १ ः गद्य

**प्र.१.(अ) खालील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा ः (6)**

मी इथे शिकायला आलो होतो. दोन खोल्यांचे घर मिळाले होते आणि मालकातर्फेच दादू नावाचा अनुभवी गडीही लाभणार होता. दादू ही व्यक्ती वरवर पाहिली, तर जरा विचित्रच दिसत होती. एक खांदा विचित्र रितीने उडवत चालण्याची त्याची लकब होती.

वाढलेली दाढी खाजवत तो माझ्याशी बोलू लागला तेव्हा माझ्या मनात आले, या म्हाताऱ्याला आपण गडी म्हणून ठेवणे महामूर्खपणाचे होईल.

हीं पीडा चुकवायची एक नवीन युक्ती मला सुचली. दादूचा पूर्वीचा पगार फक्त तीन रूपये होता. आता तो चार किंवा पाच रूपये मागेल आणि तसे मागितले, की तुझ्यासारखा लबाड मनुष्य मला नको, असे आपल्याला सहजच म्हणता येईल.

(१) खालील चौकटी पूर्ण करा ः (2)

(i) दादूचे लकब → ☐ (ii) दादूला पूर्वी मिळणारा पगार → ☐

(२) दादूचे दिसणे → ☐ (1)

(३) विरूद्धार्थी शब्द लिहा. (1)

(i) नवीन × ☐ (ii) लबाड × ☐


(४) 'दादू'च्या स्वभावातील विशेष तुमच्या शब्दांत लिहा. (2)

**प्र.१.(आ) खालील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा ः (6)**

आता समोर लक्ष दया. केवढा प्रशस्त चोथरा आहे हा! आणि त्यावर कोण बसलं आहे सांगा बरं! 'भगवान गौतम बुद्ध'. बुद्ध ओळखण्याची खूण म्हणजे पद्मासन घालून बसलेले, डोळे अर्धवट मिटलेल्या कमळासारखे आणि नजर नाकाच्या शेंडयावर खिळलेली. मुखावर करूणेचा भाव. कानाच्या पाळया लोंबलेल्या. जवळजवळ खांदयाला भिडलेल्या. मस्तकावर कुरळया केसांच्या जटा. एवढं लक्षात ठेवलंत. की तुम्हांला कोठेही गौतम बुद्ध ओळखता येतील.

इथल्या सगळया लेण्यांना नावं नाहीत; पण एकोणिसाव्या लेण्याला नाव आहे, त्याला म्हणतात गंधकुटी. हे लणे तुम्ही सावकाशीनं पाहा. बराच वेळ लागेल, कारण ते आत, बाहेर व सगळीकडे कोरीव कामानं नटलं आहे. त्याच्यासमोर द्वारमंडप आहे. खांब सागळे वाटोळे. ते पाहा दुसरे बुद्ध. खाली नव्हे, वर दोन खांबांच्या कमानीत! इथे ते उभे आहेत अन् त्यांनी एक पायघोळ अंगरखा घातला आहे. त्याच्या चुण्या कशा अगदी स्पष्ट दिसतात. मुद्रासुद्धा किती शांत. किती गंभीर!

(१) आकृतिबंध पूर्ण करा ः (2)




Scanned by CamScanner

(२) एकोणिसाव्या लेणीचे नाव ⟶ [ ] (1)

(३) लिंग ओळखा. (i) लेणे (ii) मद्रा (1)

(४) लेण्यांतील गौतम बुद्धांची मूर्ती पाहून तुमच्या मनात निर्माण झालेल्या भावना स्वभाषेत लिहा.(2)

## विभाग २ : पद्य

**प्र.२.(अ) पुढील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा : (4)**

बहु हा कनवाळुनि बहु हा दयाळु।
जाणे लळा पाळू भाविकांचा ।।

जात वित गोत न पाहेचि कांही।
घालावीं हे पायीं मिठी उगी।।

न मागतां आभारी आपेंआप होतो।
भाविकांसी देतो भुक्ति मुक्ती।।

चोखा म्हणे ऐसा लाघवी श्रीहरी।
भवभय वारी दरूशनें।।

(१) आकृतिबंध पूर्ण करा :

संत चोखामेळा यांनी परमेश्वरासाठी वापरलेली विशेषणे.
↓ [ ] ↓ [ ]

(२) परमेश्वर भेदभाव करत नाही हा विचार अभंगाच्या आधारे पटवून दया.

**प्र.२.(आ) पुढील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा : (4)**

बिन भिंतीची उघडी शाळा
लाखो इथले गुरू
झाडे, वेली, पशु , पाखरे
यांशी गोष्ट करू
बघू बंगला या मुंग्यांचा
सूर ऐकूया त्या भुंग्यांचा
फुलाफुलांचे रंग दाखवित
फिरते फुलपाखरू

(१) आकृतिबंध पूर्ण करा :

कवितेतून तुम्हांला कळलेले निसर्गातले गुरू
[ ] [ ] [ ] [ ]

(२) 'निसर्ग हाच आपला खरा गुरू आहे'. हे विधान सोदाहरण स्पष्ट करा.

Scanned by CamScanner

# विभाग ३ : व्याकरण

**प्र.३.(अ) व्याकरण घटकावर आधारित कृती सोडवा : (4)**

(1) खालील तक्ता पूर्ण करा.

| शब्द | सरळरूप | सामान्यरूप | प्रत्यय |
|---|---|---|---|
| शाळेत | | | |
| बँकेने | | | |

(2) अलंकार ओळखा.

पर्वतीच्या पायथ्याशी पंढरीने पांढरा पक्षी पाहिला.

(3) समास ओळखा.

(i) खरेखोटे (ii) यथाशक्ती

(4) मी धावत गेलो. (काळ ओळखा)

**प्र.३.(आ) व्याकरण घटकावर आधारित कृती सोडवा : (4)**

(1) विरूद्धार्थी शब्द लिहा.

(i) कुरूप (ii) कडु (iii) चढणे (iv) बसणे

(2) पुढील वाक्यांतील शब्दांचा योग्य क्रम जुळवून अर्थपूण० वाक्य तयार करा.

दोन्ही , गुरूजींनी , दिली , संघांना , शाबासकी

(3) पुढील शब्दातील अचूक शब्द ओळखा व लिहा.

(i) बगंला , बंघला , बंगला -

(ii) दूपारी , दुपारी , दुपारि -

# विभाग ४ : उपयोजित लेखन

**प्र.४.(अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा : (4)**

**मागणीपत्र**

शाळा व विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!!

साफल्य बुक डेपो, नाशिक, यांच्याकडून माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांना आगळीवेगळी आदरांजली

वाचन प्रेरणादिनानिमित्त कोणत्याही वाचनीय पुस्तकावर ५०% सवलत.

सवलत 15 ऑगस्ट ते 16 ऑक्टोबर

स्थळ :- साफल्य बुक डेपो, मंगळवार, पेठ नाशिक

- विद्यार्थी या नात्याने स्वत:साठी तुमच्या आवडीच्या पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.
- शलेय ग्रंथालय प्रमुख या नात्याने साफल्य बुक डेपोकडे पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

Scanned by CamScanner

**प्र.४.(आ) खालीलपैकी कोणत्याही एक कृती सोडवा ः** **(4)**

**(1)** पुढील उतारा वाचून एका वाक्यात उत्तर येईल असे चार प्रश्न तयार करा ः


ज्ञान मिळविण्यासाठी वाचन केली पाहिजे. छोटी-छोटी पुस्तके मुलांची मासिके वाचली पाहिजेत. तुम्हा मुलांसाठी, आनंद, चांदोबा, किशोर, पराग यांसारखी मासिके निघतात, ती दर महिन्याला वाचावयाची सवय ठेवावी. त्यात छान-छान गोष्टी, सुंदर-सुंदर कविता व उत्तम-उत्तम माहिती असते. ती वाचून मनाला आनंद होतो. तसेच तुमच्याकरिता गोष्टी, कविता असलेली कितीतरी लहान पुस्तके निघाली आहेत. निघत असतात. त्यात सुंदर चित्रे पण असतात. त्यात सुंदर चित्रे पण असतात. अशी पुस्तके मन लावून वाचण्याचा ही सराव तुम्ही ठेवावा.

**(2)** दिलेल्या मुददयांच्या आधारे कथालेखन करून त्यास योग्य ते शिर्षक दया ः

**मुद्दे** ः एक वृद्ध शेतकरी -- शेतात अंब्याची रोपे लावणे -- तेथून राजाचे आगमन -- आश्चर्य -- या झाडाची फळे तुम्हाला कशी खायला मिळणार? -- राजाचा प्रश्न -- 'मी ज्या झाडांचे आंबे आज खातो ती झाडे मी लावलेली नाहीत' शेतकऱ्याचे उत्तर -- राजाला आनंद -- मोहरांची थैली वक्षीस -- तात्पर्य.

**प्र.४.(इ) पुढीलपैकी एका विषयावर निबंधलेखन करा ः** **(4)**

**(1)** आकृतीतील मुददयाच्या आधारे पुढील विषयावर निबंध लिहा ः




**(2)** "पुस्तकाची आत्मकथा" या विषयावर आधारित निबंध लिहा.

♦♦♦♦♦

Scanned by CamScanner